पुढारी

गुरूवार २७ मार्च २०२५

# नदी शुद्धीकरणाच्या केवळ घोषणा नकोत

- डॉ. माधव गाडगीळ यांचे मत
- डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना पहिला राम नदी सेवक सन्मान प्रदान




राम नदी सेवक सन्मानप्रसंगी (डावीकडून) वीरेंद्र चित्राव, डॉ. माधव गाडगीळ, डॉ. श्रीनिवास वडगबाळकर, आनंद चितळे आणि डॉ. गुरुदास नूलकर.

पुणे : पुढारी वृत्तसेवा

नदीच्या प्रदूषणात केवळ पाणीच नव्हे, तर त्यातील वनस्पती, प्राणी यांच्यावरही विपरीत परिणाम होत असतात. त्या घटकांच्या होणाऱ्या प्रदूषणाचा अभ्यास होणे आवश्यक आहे. नदी शुद्धीकरणाच्या बाबतीत अभियान घोषित करणे पुरेसे नसून, प्रश्नाच्या मुळाशी जाऊन काम करण्याची आवश्यकता आहे, असे मत ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी व्यक्त केले.

किर्लोस्कर वसुंधरातर्फे आयोजित पाचव्या ऑनलाइन 'किर्लोस्कर वसुंधरा राम नदी महोत्सवा'च्या समारोपप्रसंगी डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना डॉ. गाडगीळ यांच्या हस्ते पहिला 'राम नदी सेवक' सन्मान प्रदान करण्यात आला. या वेळी आनंद चितळे, डॉ. गुरुदास नूलकर आणि वीरेंद्र चित्राव आदी उपस्थित होते.

डॉ. वडगबाळकर म्हणाले, राम नदीच्या आजुबाजूला असलेल्या नैसर्गिक स्रोतांचा शोध घेऊन त्याचे जतन आणि संवर्धन होणे आवश्यक आहे. मुळा- मुठा या जमिनीच्या समपातळीवर असल्याने त्याच्या आजुबाजूला असलेल्या वस्तीमुळे त्याचे जास्त प्रदूषण होते. तुलनेने राम नदी उंचावर असल्यामुळे मुळा- मुठाच्या तुलनेत राम नदीचे शुद्धीकरण करणे अधिक सोपे आहे. राम नदी शुद्धीकरण प्रकल्प यशस्वीरीत्या राबवून देशासमोर एक यशस्वी प्रारूप उभे करणे शक्य आहे.

गाडगीळ म्हणाले, प्रदूषण नियंत्रणाच्या प्रयत्नांसाठी शासकीय स्तरावर अवाक करणारे आकडे जाहीर होतात. वास्तवात प्रदूषण नियंत्रणाच्या बाबतीत नक्की काय काम होते, याच्या शासकीय निष्पत्ती लेखाजोख्यासह वैयक्तिक लेखजोखा होणे आवश्यक आहे.

Service By: Vidisha Media Network- 9881736077